# आपण समाजाचं काही देणं लागतो....

**आदरणीय महोदय,**
**सप्रेम नमस्कार**

दीपस्तंभ शिष्यवृत्ती व निवासी प्रशिक्षण केंद्रासाठी निधी सुज्ञ व संवेदनशील नागरीकांकडून देणग्या, दीपस्तंभ प्रकाशनातुन येणारा नफा व माझ्या व्याख्यानांचे मानधन यातून उभारला जातो. तरीही दरवर्षी उर्वरीत रक्कम उभारण्यासाठी कर्ज घ्यावे लागते. सर्वात जास्त खर्च हा विद्यार्थी – विद्यार्थीनींच्या निवासावर होतो. गावात विविध ठिकाणी भाडेतत्वावर घरे घेवून आपण त्यांच्या निवासाची व्यवस्था करत असतो. ही समस्या सोडविण्यासाठी जळगाव येथे विद्यापीठाजवळ ६ एकर जागा घेतली आहे. या जागेतील २५% भागात शिष्यवृत्ती योजनेतील अत्यंत गरीब व होतकरु विद्यार्थी – विद्यार्थीनींसाठी वसतीगृह बांधण्याची योजना आहे. यामुळे दरवर्षी महाराष्ट्रातील सर्व जाती धर्माच्या २०० मुला–मुलींचे भवितव्य उज्ज्वल होवू शकेल. आपल्या सगळयांच्या सहकार्याने हे वसतीगृह उभारायचे आहे व पुढील पिढयांसाठी 'माणुसकी, अत्यंत गरीब, निराधार होतकरु 'आपण समाजाचं काही देणं लागतो,' कृतज्ञता या जीवनातील अत्यंत महत्वाच्या शब्दांना कृतिशील अर्थ येईल.

दीपस्तंभच्या प्रबोधन व प्रेरणेमुळे खेड्यापाड्यातील मुलं–मुली विविध स्पर्धा परीक्षांच्या माध्यमातून करीअर घडविण्याचे स्वप्न बघू लागले आहेत. परंतु २–३ एकर कोरडवाहू जमीन असलेला अथवा मजुरी करणारा पालक आपल्या पाल्याला निवास, भोजन व मार्गदर्शनासाठी रू ४००० महिना देऊ शकत नाही. अनेक मुला मुलींचे वडील वारलेले... आई मजुरी करते .... वडील जिवंत आहेत परंतु दुर्धर आजाराने पिडीत आहेत किंवा व्यसने आहेत. कमी वयात घटस्फोटीत मुली, अपंग अंध विद्यार्थी, देवदासी भगिनींची मुले–मुली, आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांची मुले असे सर्वच विद्यार्थी दीपस्तंभमध्ये शिष्यवृत्ती योजनेचा लाभ घेतात.

शेतात पिकत नाही, पिकलं तर योग्य भाव मिळत नाही, त्यातूनही मुलांना थोडाफार खर्च केला जातो, मुलींसाठी काही उरतच नाही. अशा प्रतिकुल परीस्थितीवरही मात करुन उत्तुंग भरारी घेण्याची उमेद असणाऱ्या या तरुणाईला आपल्या सारख्या सुसंस्कृत व संवेदनशील व्यक्ति एकत्र येऊन सहकार्य करतील अशी अपेक्षा आहे. त्यातून शेकडो तरुणांचे भवितव्य घडेल. संस्थेचे माजी विद्यार्थी सुद्धा यात सक्रीय सहभाग व आर्थिक योगदान देत आहेत.

या प्रकल्पासोबतच उर्वरीत जागेवर चांगला माणूस व चांगले नेतृत्व घडविण्यासाठी दीपस्तंभ लीडरशिप डेव्हलपमेंट निवासी महाविद्यालय सुरु करीत आहोत. १२ वी नंतर ३ वर्षांचा हा कोर्स असेल देशासाठी प्रशासन, राजकारण, शिक्षण, उद्योग, समाजासाठी या क्षेत्रात नेतृत्व करतील असे विद्यार्थी घडविले जातील.

यासाठी कर्ज स्वरुपात रक्कम उभारली जाणार आहे. पण खूप जास्त कर्ज उभारुन हे बांधकाम केले तर मूळ उद्देश बाजूला ठेवून पूर्ण:त पैसा मिळविणे व कर्ज फेड करण्याकडे लक्ष केंद्रीत करावे लागेल. तसे होवू नये व भविष्यात उत्तुंग प्रतिभेचे तरुण घडविता यावेत यासाठीच या महाविद्यालया–साठीही आपले सर्वांचे योगदान आवश्यक वाटते.

स्वत:साठी व स्वत:च्या मुलांसाठी सर्वच धडपडतात. परंतु इतरांसाठीही थोडं करुयात. ''जगाचा इतिहास असं सांगतो की ज्यांनी समाजाला भरभरुन दिलं त्यांचाच सन्मान झाला... तेच लक्षात राहिले...'' खरं म्हणजे देण्यातून आपल्यालाच खूप काही मिळते... आनंद, समाधान व सेवेची संधी!

| | | | |
|---|---|---|---|
| **डॉ. के. बी. पाटील** | **श्री. निळकंठराव गायकवाड** | **श्री. भरत अमळकर** | **यजुर्वेंद्र महाजन** |
| माजी कुलगुरु, उमवि जळगाव | माजी प्राचार्य, डायट | सामाजिक कार्यकर्ते | कार्यकारी संचालक |

आपण दिलेल्या आर्थिक योगदानास आयकरातून ८०–जी अंतर्गत सूट मिळेल. आपण हे योगदान खालील प्रकारे देवू शकता.

| | | | |
|---|---|---|---|
| १) वसतिगृहासाठी | रु. २१ लाख | शिष्यवृत्ती योजनेसाठी – | |
| २) मोठ्याहॉलसाठी | रु. २१ लाख | १) एका विद्यार्थ्याचा वार्षिक संपूर्ण खर्च – | रु. ५०,०००/– |
| ३) मेस | रु. १० लाख | २) १ वर्षाचा प्रशिक्षण खर्च – | रु. २५,०००/– |
| ४) छोटा हॉल – | रु. १० लाख | ३) ६ महिन्यांचा प्रशिक्षण खर्च – | रु. १२,५००/– |
| ५) एक वर्ग ( एकूण ३ प्रत्येकी ) | रु. ५ लाख | ४) ३ महिन्यांचा प्रशिक्षण खर्च – | रु. ६,२५०/– |
| ६) एक खोली (एकूण २५ खोल्या प्रत्येकी) | रु. ३ लाख | ५) पुस्तकांसाठी खर्च – | रु. १०००/, २०००/– |
| ७) आजीवन सदस्य – | रु. १ लाख | ६) १ महिन्याचा खर्च – | रु. १५००/– |
| | | ७) १ महिन्याचा निवास खर्च – | रु. १०००/– |

**दीपस्तंभ बहुद्देशिय संस्था** **रजि. नं.** : F10952 Jalgaon Dt.13-11-2009
**कार्यालय** : ४२, हौसिंग सोसा., सहयोग क्रिटीकल केअर हॉस्पिटल जवळ, जळगाव–४२५ ००१. **दूरध्वनी** : ०२५७–२२४२२९९
**भ्रमणध्वनी** : यजुर्वेंद्र महाजन ९८२२४ ७६५४५, राजेंद्र पाटील ९४२२७७९२३१
**ई–मेल** : yajurvendra79@gmail.com **वेबसाईट** : www.deepstambh.org

**देणगीसाठी माहिती :**
**नांव** : दीपस्तंभ बहुद्देशिय संस्था **बँक** : कॉर्पोरेशन बँक, जळगाव **खाते क्र.** : 037901601100014
**IFSI No.** : CORP0000379